फक्त सभासदांसाठी
वर्ष ४३वे, अंक ४था ❋ ऑगस्ट २०२४

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यापीठ, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❋ अध्यक्ष ❋
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

❋ संपादक ❋
श्री. मुकुंद गायधनी
मो.९४२२३०१८५१

## अध्यक्षीय

**गुरुपौर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा.**

गुरुः ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा ।
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ।।

भारतीय संस्कृतीने गुरू-शिष्य परंपरेचे जगाला दिलेले मोठे योगदान आहे. आपल्या संस्कृतीचे हे सखोल आणि विज्ञाननिष्ठ आकलन आहे. गुरुविण कोण दाखवील वाट? संत कबीर म्हणतात, 'गुरु गोविंद दोनो मिले काके लागू पाय. गुरु आणि ईश्वर दोन्ही एकत्र सामोरे आले तर मी पहिल्यांदा गुरूंना वंदन करीन.

ईश्वराकडे जाण्याची वाट ही गुरूंकडूनच असते. गुरू जो जीवनाची ज्ञानाची ईश्वराची वाट दाखवतो. आद्य जगद्‌गुरु व्यास महर्षी ज्यांनी उच्च कोटीची साधना करून वेदांमधील विचार सर्वांना समजतील अशी सूत्रे मांडली ती ब्रह्मसुत्रे 'महाभारताची निर्मिती आणि भगवद्‌गीतेची निर्मिती'. त्यांचे स्मरण म्हणून आप आपल्या जीवनातील गुरूंचे वंदन करतो अशी ही व्यास पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते.

'गुरु शिष्यांचे पवित्र नाते जपणारी ही पौर्णिमा'. पौर्णिमे दिवशी चंद्राची पूर्ण शक्ती व्यक्त होते. आपले पहिले गुरूही आई-वडील आहेत. म्हणून 'मातृदेवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव. आचार्य म्हणजे सर्व शिक्षक- ज्ञानार्जन करणारे जाणकार व्यक्ती. आपण देवाला नमस्कार करतो, अर्थ न लक्षात घेता स्तोत्र मंत्रपठण करतो, प्रार्थना करून देवाची स्तुती करतो. इच्छा पूर्ण व्हावी अशी अपेक्षा करतो. देवत्व जाणून घेऊन ते माझ्यामध्ये प्रवेश करतील असा बदल स्वतःमध्ये घडवून आणणे हे देवाचे डोळसपणे केलेले धर्माचरण आहे आणि हेच धर्म वाक्य आहे.

हीच देवपूजा किंवा गुरु पूजा आहे . आपल्या संस्कृतीवर गेली हजारो वर्षे परकीय आक्रमण होऊन सुद्धा गुरु-शिष्य परंपरेने वेदातीत ज्ञान परंपरा टिकून आहे. गुरुदत्त म्हणतात माझे २३ गुरु आहेत. दगड, झाड, कुत्रा यांनाही देव मानले आहे. खडकांकडून अचलपणा शिकलो, खंबीर राहणे शिकलो. कुत्र्याकडून इमानदार आणि माणसाचा सर्वोत्तम मित्र कसे व्हावे हे शिकलो. झाडाकडून निरपेक्ष भावाने आसरा देणे व फळ देणे हे शिकलो, असे प्रांजळ भावाने दत्तगुरु सांगतात. गदिमा लिहितात,

'बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो माझे गुरू
झाडे, वेली, पशु, पाखरे
यांशी गोष्टी करू.

अशा या पवित्र गुरु-शिष्य परंपरेला आदराने नमन करूया .

**डॉ. राधा संगमनेरकर**

## संपादकीय

**क्रिएटिव्ह चॅरिटी**

माझ्या एवढ्यातल्या वाचण्यात आलेला किस्सा. जगभर शाखा पसरलेल्या असलेल्या कंपनीतल्या भारतातील शाखेमध्ये एके दिवशी सकाळी इटलीतील शाखेच्या मॅनेजरने ई-मेल पाठवली) ही ई-मेल सर्व शाखांना पाठवली होती. ई-मेलचा सारांश असा होता..

''सर्वात प्रथम तुमची माफी मागतो. कारण मी जे सांगणार आहे त्याचा संबंध ऑफिसच्या कामाशी नाही. मी तुम्हाला काही क्षणांसाठी गंभीर मूडमध्ये नेणार आहे. माझ्या ओळखीच्या १० वर्षे वयाच्या मुलाला कॅन्सर झाला आहे. गेल्या आठवड्यात त्याची केमोथेरपी सुरू झाली आहे. त्याने व आजोबांनी घरातल्या भिंतींवर एक जगाचा नकाशा लावला आहे. तो मुलगा सध्या त्याला ज्या ठिकाणहून पत्र येते त्या ठिकाणी नकाशावर एक छोटा झेंडा लावत असतो. मी तुम्हाला विनंती करतो तुम्ही तुमच्या देशातून त्याला एक पोस्टकार्ड पाठवा. आपली कंपनी जगभर पसरलेली आहे म्हणून माझी ही छोटिशी विनंती आहे.

पुढची पाच मिनिटे डोळ्यांसमोर इटलीतील घर, तो

मुलगा, आजोबा व घरातील नातलग दिसले. अशी ई-मेल पाठवण्याचे सुचणाऱ्या इटलीच्या मॅनेजरच्या सृजनात्मक कल्पना राबविण्याच्या धाडसाचे कौतुक वाटले. मी असे काय करावे, ज्याने त्या आजारी मुलाची जगण्याची उमेद वाढेल?

गरज आहे त्या क्रिएटिव्ह चॅरिटीची. जे त्या इटालियन मॅनेजरने केले. दुसऱ्याला देण्यासाठी आपल्याकडे काय उत्कृष्ट आहे ते आपण ओळखायचे व त्या गोष्टीची कोणाला गरज आहे ते शोधायचे.

अशा प्रकारच्या 'संत'पदापासून आपण सगळेच बरेच दूर आहोत. पण 'जगण्याच्या' या दिंडीत आपण एक वारकरी म्हणून सामील व्हायला काय हरकत आहे?

(संदर्भ: नवीन काळे यांच्या 'काहीतरी नवीन' या पुस्तकातील एक सदर)

**मुकुंद गायधनी**

## आजी आजोबांचा नातवंडांशी संवाद

१२ जुलै, मंगळवार रोजी स्नेहसेवा संस्थेत डॉ. सुनील गोडबोले, एम.डी., बालरोगतज्ज्ञ यांचे 'आजी आजोबांचा नातवंडांशी संवाद' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. मुकुंद संगमनेरकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. गोडबोले यांची या विषयावर नऊ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

डॉ. गोडबोलेंनी श्रोत्यांशी संवाद साधत विषयाला सुरुवात केली. मुलांना आजी-आजोबांकडून काय हवे असते? प्रेम, कौतुक, सुरक्षितता, संवाद, खेळायला सवंगडी, श्रोता, लाड पुरवणारे, प्रश्नांची उत्तरे देणारे असे आजी आजोबा हवे असतात. नवीन पिढी कारकीर्द प्रभावित असल्यामुळे मुलांच्या जन्म व संगोपनाचा पुरेपूर आनंद घेऊ शकत नाहीत. अशा वेळेस आजी-आजोबा नातवंडांमध्ये रमतात. आजी आजोबांनी स्वत:च्या मुलांना शिस्तीत वाढवलेले असते, पण ते नातवंडांचे मात्र लाड करतात. अशावेळेस जर मधली पिढी मुलाला शिस्त लावत असेल तर आजी आजोबांनी त्रयस्थाची भूमिका घ्यावी.

नवीन पिढीतील मुलांचे दूरदर्शन- भ्रमणध्वनी बघण्याचे प्रमाण वाढले आहे. या माध्यमावरील चलचित्रे अतिशय जलद गतीने बदलतात, त्याप्रमाणे त्यांना सगळे जलद हवे असते. त्यातून ए.डी.एच.डी. लक्षणांची सुरुवात होते. ह्यामुळे मुले अंतर्मुख, आत्मकेंद्री, स्वार्थी होतात. जेवताना पचनेंद्रिय जागृत होऊन रंग, वास, चव व दृश्य संवेदनेमुळे अन्न पचनास मदत होते. पण टी.व्ही किंवा मोबाईल बघत जेवल्याने पचनाच्या तक्रारी सुरू होतात.

मुलांच्या शाळेतून तकार आल्यास आई भावनाग्रस्त होते. तिच्या भावनांचे नियोजन आवश्यक असते. ह्यात आजी-आजोबांची मदत उपयुक्त ठरते.

बाळ झाल्यावर घरातल्या सदस्यांनी चर्चा करून बालसंगोपनाचे निकष व नियम ठरवावेत. व अमलात आणावेत. आजी-आजोबांनी आई-वडीलांच्या भुमिकेत जाऊन विचार करणे आवश्यक आहे. सध्याच्या पिढीला बऱ्याच आव्हांनांना सामोरे जावे लागते. त्यात वरीष्ठ पिढीची होणारी घालमेलही डॉक्टरांनी व्यक्त केली. अशाप्रकारे हसत-खेळत प्रेक्षकांशी संवाद साधत डॉ. गोडबोलेंनी विषयाची उकल केली. डॉ. विद्या शर्मा यांनी आभार प्रदर्शन केले.

**सौ.प्रविणा अंबुलकर**

## कालिदासाच्या कथा

आषाढ महिन्याचा पहिला दिवस हा महाकवी कालिदास यांचा जन्मदिवस म्हणून साजरा होतो. मेघदूतामुळे ही आठवण तर जास्तच प्रकर्षाने होते. वेद, रामायण, महाभारत आणि पुराणांवर आधारित संस्कृत नाटके आणि कविता रचणारा महाकवी कालिदास यांना 'भारताचा शेक्सपिअर' म्हणूनच ओळखले जाते. त्यांच्या साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय संस्कृत भाषेचा अभ्यासच पूर्ण होऊ शकत नाही. स्नेहसेवाने आषाढमासाचे औचित्य साधून ह्याच पार्श्वभूमीवर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

पेशाने फिजिशिअन असलेल्या आणि संस्कृतचा अभ्यास असलेल्या, डॉ. लिली जोशी यांचे 'कालिदासाच्या कथा' या विषयावर आशयसंपन्न व्याख्यान झाले. हजारो वर्षं रसिकमनावर अधिवर्चस्व गाजवणाऱ्या कालिदासाबद्दल खूप नवीन माहिती त्यांनी सादर केली. कालिदास आर्य संस्कृतीचा कट्टर पुरस्कर्ता होता. कालिदासाचा नेमका कालावधी काय, तो कुठून आला याबद्दल रोचक आख्यायिका त्यांनी कथन केल्या. ह्या आख्यायिका ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध झाले. कालिदासाच्या प्रतिभेमुळे त्याचा मत्सर करणारेही होते. मात्र कालिदासाचे मन मोठे होते. म्हणूनच तो इतरांना मदत करायचा. चंद्रगुप्ताच्या आचार्य मंडळात कालिदासाचा समावेश होता. यावरून त्याचे महात्म्य अधोरेखित होते.

कालिदासाच्या अनुषंगाने राजा भोजच्या काही कथांनी डॉ. जोशी यांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले. राजा भोज आणि कालिदास ही कशी अपूर्व जोडी होती हे त्यांनी अतिशय रंजक पद्धतीने सांगितले.

कालिदास कट्टर शिवभक्त होता. त्याने खूप प्रवास केलेला होता. त्याचे सूक्ष्म निरीक्षण, भोगोलिक दृष्ट्या

अचूक माहिती असणे हे वैशिष्ट्य विलक्षण वाटले.

कालिदासाला वैवाहिक सुख नव्हते. त्याने दक्षिणेत गेल्यावर नर्तिकेकडे मुक्काम केला आणि त्या नर्तिकेनेच कालिदासाचा खून का केला हेही डॉ. जोशी यांनी सांगितले. अशी दु:खाची किनार असलेला कालिदासाचा जीवनपट आहे. अज्ञातवासातील अंत झालेल्या महाकवी कालिदासाचे स्मरण चिरंतन राहील यात शंका नाही.

आपल्या अत्यंत यशस्वी झालेल्या शिष्येचा परिचय डॉ.विद्या शर्मा यांनी करून दिला. त्या परिचयात आपल्या शिष्येबद्दल असलेला अभिमान आणि जिव्हाळा यांचे दर्शन झाले.

डॉ. लिली जोशी यांची कथन शैली अशी होती की संपूर्ण दृश्यच श्रोत्यांच्या मनात उभे राहायचे. जणू आपण त्या प्रसंगात जातीने हजर आहोत. डॉ. जोशींनी प्रसंगोचित संस्कृत श्लोक आणि त्यांचा भावार्थ सुंदर पद्धतीने विशद केला. आपल्या ओघवत्या वाणीने त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संशोधनाधारित निवेदनातून डॉ. लिली जोशी यांच्या प्रचंड व्यासंगाची प्रचिती आली. अशा शब्दात प्रा. रवीन्द्र कोठावदे यांनी आभार मानले.

**प्रा. रवींद्र कोठावदे**

## कथावाचन

मंगळवार दि. २३ जुलै रोजी कथावाचनाचा कार्यक्रम झाला. इंग्लिशमध्ये लेखन करणाऱ्या भारतीय साहित्यिकांच्या या कथांचे सुधा जावडेकर यांनी मराठीत भाषांतर केले होते. रवींद्रनाथ टागोर या नोबेल पुरस्कारविजेत्या लेखकांची कथा 'सुट्टी' (The home coming) डॉ. विद्याताई शर्मा यांनी वाचून दाखवली. फटिक चक्रवर्ती हा पौगंडावस्थेतील मुलगा मामाकडे राहायला जातो. पर्यावरणातील फरक, वाढत्या वयातील मानसिक प्रश्न आणि मोठ्या शहरातील आयुष्य यामुळे त्याच्यावर होणारे परिणाम आणि अखेरीस मृत्यू अशी ही कथा आहे. डॉ. विद्याताईंनी ती इतक्या परिणामकारक तऱ्हेने वाचली की श्रोते भारावून गेले.

आर.के.नारायण या पद्मभूषण, पद्मविभूषण मिळालेल्या लोकप्रिय लेखकाची 'ज्योतिषी' (An Astrologer's Day) ही कथा सौ. रेखाताई कसरेकर यांनी अप्रतिमपणे सादर केली. सामान्यत: रस्त्यावर कुडमुडे ज्योतिषी दिसतात. अशा एकाची कथा - तो असा ज्योतिषी म्हणून व्यवसाय करताना अगदी यथार्थ वर्णन या कथेत आहे. धंद्याची जाण, मानवी मनाचा ठाव घेणारी चतुराई वगैरे सांगून अखेरीस तो ज्योतिषी का झाला तो प्रसंग येतो आणि संपूर्ण कथेचा चेहरामोहराच बदलतो. सौ. रेखाताईंनी कथेत अंतर्भूत असलेला अर्थ श्रोत्यांना कळेल अशा तऱ्हेने वाचन करून वाहवा मिळवली.

मुल्कराज आनंद या पद्मविभूषण मंडित लेखकाची कथा 'मिशा' (A pair of Mustachios) सुधा जावडेकर यांनी वाचून दाखवली. उतरती कळा लागलेल्या एका खानदानातील व्यक्तीला आपल्या पूर्ववैभव व मनमरातबाचा अभिमान आहे. या मानामध्ये मिशांची टोके वर वळवणे हे एक मानचिन्ह आहे. दुसऱ्या कोणीही तशा मिशा ठेवून आपली बरोबरी करू नये यासाठी हा सरदार आपले सर्वस्व गमावतो, दरिद्री बनतो. परंतु मानचिन्ह- मिशांची टोके वर वळवणे- राखतो. जरा प्रहसनात्मक अंगाने लिहिलेली कथा वरकरणी विनोदी वाटली तरी यातील नायक ऱ्हास पावणाऱ्या जीवनपद्धतीचा प्रतीक असल्याने कथेचा आंतरप्रवाह विचार करायला लावतो.

सौ. गीता भुर्के यांनी आभार मानले. या महिन्यातील वाढदिवस असलेले सभासद व गटक्रमांक चारचे सभासद यांचा सत्कार करून कार्यक्रम संपन्न झाला.

**सुधा जावडेकर**

## 'आनंदी संसार' संग्रहालयास भेट

३० जुलै रोजी स्नेहसेवा संस्थेतर्फे सभासदांची कसबा पेठेतील त्वष्टा कासार आळीतील 'आनंदी संसार' या तांब्या-पितळेच्या भांड्यांच्या संग्रहालयाला भेट दिली. ही भेट प्रा. श्याम भुर्के यांनी आयोजित केली होती.

या निमित्ताने उपस्थित सभासदांनी बऱ्याच वर्षांनंतर किंवा पहिल्यांदाच पुण्यातल्या सुमारे साडेतीनशे वर्षे प्राचीन वास्तव्य असलेल्या मध्यवर्ती प्रभागाची व त्यातील पुनर्विकसित लोकवस्तीचा अनुभव घेतला.

हे संग्रहालय म्हणजे एका दालनात मांडलेल्या असंख्य भांड्यांचा एक विस्मयकारक नजारा आहे. आनंदी संसार संग्रहालयाच्या सर्वेसर्वा श्री. गिरीश पोटफोडे यांनी सभासदांना दालनातील विविध वस्तुंचा संदर्भासहितीत परिचय करून दिला. उपस्थितांच्या सुविधेसाठी बारा-पंधरा जणांच्या दोन गटांमध्ये प्रत्येकी वीस-पंचवीस मिनिटे माहिती दिल्याने सभासदांचे शंकानिरसन व उचित संदर्भ देणे सोपे झाले. यातून मिळालेली महत्त्वाची माहिती म्हणजे -

शतकभरातील तीन पिढ्यातील राहणीमानातील बदल संग्रहालयातील भांड्यांतून दिसला. पूर्वीच्या तांबे पितळ्याच्या मोठ्या भांडड्यांची जागा स्टेनलेस स्टील, काच, प्लास्टिक, हिंडाल्युमिन ह्या वस्तूंनी व्यापली आहे. उदा. हंडे, कळशा, घंगाळ, बंब, डेरा, पातेले, लोटे, कलश, पूजेतले समया,

तबक यांची जागा मिक्सर, वॉटर फिल्टर व कटलरी, डिशेश यांनी घेतली आहे. जुनी भांडी पाहून प्रत्येकाला आपल्या आजी, पणजी, मावशीच्या संसाराची आठवण झाली. जुन्या भांड्यामधील घाटांचे वैविध्य भौगोलिक परिस्थितीनुरूप कसे बदलते हे स्पष्टीकरण पटणारेच होते.

कारागीर ते कारखानदार ही सुबत्तेची वाटचाल प्रशंसनीय असली तरी तीनशे ते तीस ही रोडावलेली आकडेवारी हे तंत्रज्ञानाधारीत बदल, उदा. प्रेस व इतर यंत्रांच्या वापरामुळे झाल्याची माहिती लक्ष वेधून घेणारी होती.

सामाजिक प्रथांमधील बदल जसे पूर्वी लग्नात मुलीला रुखवतात गृहोपयोगी भांड्यांची भेट देण्यापेक्षा निवडक चांदीची भांडी किंवा वस्तू देण्याचा बदल हे समजण्यासारखे होते.

गृह सजावटीसाठी पूर्वीच्या वस्तूंची मागणी भविष्यातील व्यवसायवाढीला पोषक आहे. त्वष्टा कासार समाजासाठी ह्या पिढीतील जाणत्या मंडळींनी राबवलेले उपक्रम खूपच प्रेरणादायक वाटले. उदा. वाचनालय, पतसंस्था कार्यकारी मंडळातील निवडणुका व सर्व वयातील मंडळी व महिलांचा वावर आश्वासक वाटला. समाजातील नवीन इमारती, कायम स्वरूपी विक्रीकेंद्रे, कार्यालय व विविध उत्सवातील सहभाग खूप सकारात्मक वाटले. नवरात्र उत्सव व गणपती उत्सवात पुण्याचा मानाचा सहावा गणपती हे स्थान व त्यासाठी रावबवलेले उपक्रम कल्पक आहेत.

संग्रहालय भेटीची सांगता स्नेहसेवाच्या अध्यक्षा डॉ. राधा संगमनेरकर व प्रा. श्याम भुर्केनी श्री गिरीश यांचा शाल, श्रीफळ व पुस्तके भेट देऊन केला व त्यांच्या सहकाऱ्यांचाही गौरव केला.

**मुकुंद गायधनी**

## गुरूपौर्णिमा

चालायला नाही, चालवायला शिकवतो
बोलायला नाही बोलून दाखवायला शिकवतो
खायला नाही खाऊ घालायला शिकवतो
विश्वास मिळवायला नाही टिकवायला शिकवतो
शिक्षण शिकायला नाही, शिकवायला शिकवतो
पैसा कमवायला नाही दान करायला शिकवतो
प्रेम मिळवायला नाही वाटायला शिकवतो
नाती तोडायला नाही जोडायला शिकवतो
आयुष्य फक्त घालवायला तर ते जगायला शिकवतो
तो म्हणजे गुरू.. हे सर्वांना ज्ञात आहे.

गु, म्हणजे अंधार, अज्ञान आणि रू म्हणजे म्हणजे प्रकाश (ज्ञान) अज्ञानाच्या अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेतो तो गुरू..

२००० इसवी सन पूर्व यादिवशी जन्मलेले वेद व्यास, वेद उपनिषद आणि पुराणांचे लेखक – यांना सर्व मानवजातीचे गुरू समजले जाते. आणि त्यांचा जन्मदिवस हा गुरू पौर्णिमा म्हणून समजला जातो.

जीवनातील पहिल्या गरजा शिकवणारे व भावनिक गरजा पुरवणारे पालक. परंतू जीवन विकास सुरळीत चालण्यासाठी गुरूची गरज. गुरू आणि शिष्य नाते म्हणजे एक पूल. गुरूच्या कृपेने संस्काराने, शिकवणीने ध्येयाचा ध्येय गाठण्याचा मार्ग सुकर होतो.

आजकाल माणूस जेव्हा यशशिखर गाठतो तेव्हा ते मी माझ्या कष्टाने, हिमतीने गाठलं असं म्हणतो, पण तुझा पाया गुरूंनीच रचला आहे, हे अहंकारामुळे सोयीस्कररित्या विसरून जातो. त्याला भान आणण्यासाठी 'गुरू पौर्णिमे'चे प्रयोजन आहे, असं मला वाटतं.

**सौ. अंजली हतवळणे**